महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या खात्यातील Missing Credits (गहाळ रकमा) व unposted items बाबत सर्व विभागांना सूचना......

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : भनिनि १११८/(प्र.क्र.०६/१८)/१३-अ,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २९ मे, २०१८.

वाचा :

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.भनिनि १११५/४८६/प्र.क्र.१५१/१५/१३-अ, दि.०१/०१/२०१६.

२) या कार्यासनाचे क्र.भनिनि-१११६/३६०/प्र.क्र.९५/१३-अ, दि.०६/१०/२०१६ चे पत्र.

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचे क्र.D.O.No.PF Misc/Genl Corr/K-695/Vol III/361, दि.०३/०३/२०१७ चे पत्र.

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचे क्र.D.O.No.PF12/Missing Credits/598, दि.२०/१२/२०१७ चे पत्र.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचे क्र.D.O.No.PF Misc/Ch/Missing Credits/K-760/246, दि.०६/०३/२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ३६ अ. अन्वये भनिनि खात्यातील जमा किंवा खर्चाच्या रकमांच्या गहाळ झालेल्या नोंदींचे समायोजन करण्याची कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने महालेखापाल कार्यालयाकडून उपरोक्त संदर्भ क्र.४) येथील पत्रान्वये असे कळविले आहे की, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या खात्यावर Missing credits (गहाळ रकमा) च्या नोंदी असून अशा वर्गणीदारांची नावे, खाते क्रमांक व Missing credits चा महिना याबाबतची माहिती यापूर्वी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना भनिनि वार्षिक लेखा विवरणपत्रासह महालेखापाल कार्यालयाकडून पाठविण्यात आली आहे. तथापि, दरवर्षी वर्गणीदारांच्या भनिनि वार्षिक लेखा विवरणपत्रामध्ये Missing credits असल्याचे आढळून येते. तसेच वर्गणीदारांच्या Missing credits व unposted items बाबतची माहिती राज्य शासनाच्या सेवार्थ या संकेतस्थळावर तसेच महालेखापाल कार्यालयाच्या http://www.agmaha.cag.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत Missing credits व unposted items ची संख्या कमी झाली नसल्याबाबत महालेखापाल यांनी खेद व्यक्त केला असून भनिनि वर्गणीदारांच्या खात्यातील Missing credits व unposted items च्या नोंदीचे निराकरण करणे तसेच सदर रकमांची संख्या पूर्णत: कमी करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत सर्व शासकीय कार्यालयांना (संबंधित सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना) देण्याबाबत महालेखापाल यांनी सूचित केले आहे.

भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या खात्यातील Missing credits ची संख्या कमी करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ३६ अ. च्या पोटनियम (अ) मध्ये देखील missing credits च्या नोंदींचे निराकरण करण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. तथापि, दरवर्षी महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या भनिनि वार्षिक लेखा विवरणपत्रामध्ये वर्गणीदारांच्या खात्यावर Missing credits मोठ्या प्रमाणात असल्याचे महालेखापाल कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सद्य:स्थितीत ४६७५५ इतक्या वर्गणीदारांच्या खात्यावर Missing credits असून ३१३८० इतक्या वर्गणीदारांच्या खात्यावर unposted items असल्याचे महालेखापाल कार्यालयाच्या अभिलेखामध्ये आढळून आले आहे.

<u>शासन परिपत्रक</u> :

वरील परिस्थितीबाबत सर्व संबंधित कार्यालयांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील तसेच विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी महालेखापालांच्या किंवा राज्य शासनाच्या संकेतस्थळावरील SEVARRTH या संकेतस्थळावर important links या लिंकखाली उपलब्ध असलेल्या Missing Credits व unposted items ची यादी उपलब्ध (Download) करुन घेवून त्यानुसार Missing Credits व unposted items चे पूर्णत: निराकरण करण्याकरिता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाच्या अभिलेखांची पडताळणी करावी व विहित कार्यपद्धतीनुसार त्यांचे निराकरण होणेबाबत योग्य ती तात्काळ कार्यवाही करावी.

तसेच सर्व भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांनी देखील आपल्या नावासमोर Missing Credits दर्शविण्यात आले आहेत किंवा कसे याची तपासणी करुन त्यानुसार संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचित करावे.

२. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील नियम ३६ अ. मधील विहित कार्यपद्धती तसेच त्याखालील पोटनियमांचे संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कटाक्षाने पालन करावे. भविष्य निर्वाह निधी संदर्भात योग्य नोंद न झालेल्या गहाळ रकमांच्या नोंदी वर्गणीदारांच्या खात्यांमध्ये तातडीने होण्याच्या दृष्टीने संबंधित कार्यालय प्रमुखाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. महालेखापालाकडून गहाळ रकमांची माहिती प्राप्त झाल्यानंतरही ज्या प्रकरणी अवाजवी विलंब झाला असेल तर, अशा विलंबामुळे देय होणाऱ्या व्याजापायी शासनाला जे नुकसान सहन करावे लागेल, त्याची भरपाई विलंबास कारणीभूत असणाऱ्या कर्मचाऱ्याकडून आणि/ अथवा कार्यालय प्रमुख यांच्याकडून वसूल करण्यात यावी. याबाबत करावयाच्या कार्यवाहीची जबाबदारी सर्व कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील.

३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र.३, ४, व ५ येथील पत्र सामान्य प्रशासन विभागाच्या www.gad.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यामध्ये महालेखापालांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी.

४. उपरोक्त प्रमाणे सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देवून त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घ्यावा व एकत्रित अहवाल महालेखापाल कार्यालयास सादर करण्याबाबत सूचित करावे. तसेच सदर नियमांतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची असल्याने विभागांनी आपल्या क्षेत्रीय कार्यालयांकडून यासंदर्भात होत असलेल्या कार्यवाहीचा आढावा दर तीन महिन्यांनी घ्यावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५३०१६५२०७३९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhatu Sambhu Wankhede

Digitally signed by Bhatu Sambhu Wankhede
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=493af62b137d3b8ad2fb93133b4b083c9cafb89b6793bfa8d7ebb7ba735e6d9d, serialNumber=454f1eaad82ae32f06775522a32735d46dc9a815a777254a802deaa980512d11, cn=Bhatu Sambhu Wankhede
Date: 2018.06.04 11:19:38 +05'30'

(भ.सं.वानखेडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
२. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद,
३. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद,
४. *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
५. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
६. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
७. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
८. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
९. *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१०. *सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
११. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई, (१० जादा प्रतींसह)
१२. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई, (१० जादा प्रतींसह)
१३. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर, (१० जादा प्रतींसह)
१४. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर, (१० जादा प्रतींसह)
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
१६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१९. मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखा), कोंकण भवन, नवी मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,

२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३. भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा विभाग, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र यांचे कार्यालय, भविष्य निर्वाह निधी शाखा, जुनी.सी.जी.ओ.बिल्डिंग, न्यू मरीन लाईन्स, १०१ महर्षि कर्वे रोड, मुंबई- ४०० ०२० (५० जादा प्रतींसह)
२४. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई,
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,
२६. मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
२७. सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख (मंत्रालयीन विभागांमार्फत)
२८. मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
२९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
३०. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना), त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.
३१. निवडनस्ती.

*पत्राने